MHKO090002542013

## रे.क.नं. ५९/२०१३ मधील नि.९३ वरील आदेश

१.        अर्ज आणि त्यावरील म्हणणे वाचले. उभय पक्षाचे म्हणणे ऐकले. प्रतिवादी नं.१ हा दि.१०.०८.२०२० रोजी मयत झालेला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी नं. १ चे वारस आणणेकरीता जो विलंब झाला आहे तो जाणूनबुजून करणेत आलेला नाही. तसेच ऑगस्ट २०२० नंतर कांही दिवसांतच कोवीड आजारामुळे सर्वत्र बंद पुकारणेत आला. त्यानंतर वादीला वारसांची योग्य माहिती मिळणे अशक्य झाले. सबब या सर्व कारणामुळे वेळेत वारस अर्ज दाखल करता आला नाही. त्याचप्रमाणे पुढे असे नमूद केले आहे की, प्रतिवादी नं. १ मयत झाला आहे अशी पुरशीस देखील प्रतिवादीनी दिली नव्हती, त्यामुळे देखील त्याच्या मृत्यूची माहिती वादींना मिळाली नाही.

२.        मी अर्जातील सर्व कारणांचा विचार केला आणि मला असे वाटते की, सदर कारणे ही विलंब माफ करणेस पुरशी आहेत. दावेचे स्वरुप पाहता देखील प्रस्तुतचा वाद गुणदोषावर निकाली होणे गरजेचे आहे. जो विलंब झाला आहे. त्याबाबत प्रतिवादी नं.१ च्या वारसांना नुकसान भरपाई खर्च देता येईल. झालेला विलंब पाहता वादींनी प्रतिवादी नं. १ च्या वारसांना खर्च रक्कम रु.५००/- अदा करणे योग्य राहील.

३.        वर नमूद केल्याप्रमाणे झालेला विलंब माफ करण्याजोगा असल्यामुळे अबेटमेंट रद्द करणेत येत आहे आणि वादीस प्रतिवादी नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे. सबब खालील आदेश -

## आदेश

१.    अर्ज नि.९३ मंजूर करणेत येत आहे आणि वादींना प्रतिवादी नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी देण्यात येत आहे.

२. वादींनी १४ दिवसाच्या आत दावा दुरुस्त करावी व दुरुस्त प्रत आणि त्यांच्या नक्कला दाखल कराव्यात.

Gajanan Vijayrao Deshpande

Digitally signed by Gajanan Vijayrao Deshpande
Date: 2022.09.23 12:05:23 +0530

दि.१६/०९/२०२२

**( जी. व्ही. देशपांडे )**

**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, गडहिंग्लज**